# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ४११ /२०२४-२५ दिनांक : ०८ /०८ /२०२४

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ४९१ /२०२४-२५ दिनांक : ०८/०८/२०२४

**// जाहीर नोटिस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) चिनमय शांती धाम को.ऑ.हौ.सो.लि.यांचे दि.२९/०७/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | पेल्ट्रोफॉर्म | २५ ते ३० फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड चिनमय शांतीधाम शांती धाम को.ऑ.हौ.सो.लि. बिल्डींग नं ए -८,९ शांती धाम, भक्ती वेदांत हॉस्पिटल मागे,मिरारोड (पु.) येथिल मनपा रोड वरील असून एका बाजूने झुकलेले आहे.सदर झाडांच्या खोडावर तडे गेले आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडूमन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे. |
| **२) जेष्ठा सृष्टी को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. ०१/०८/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | पेरु | ०७ ते ०८ फुट | ०२ | ०५ वर्ष | सदरची झाडे जेष्ठा सृष्टी को.ऑ.हौ.सो.लि. सृष्टी हौसींग कॉम्पलेक्स,सेक्टर २ मिरारोड (पु.) येथिल असून झाडे पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये गेलेलीआहे. झाडाच्या मुळामुळे पिण्याच्या पाण्याच्या टाकीला तडे गेले आहे. तसेच स्लॅब कोसळून पाणी दुषित होत आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाडे पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाडे काढणे आवश्यक आहे. |
| २ | फणस | १० ते १२ फुट | ०१ | ०८ वर्ष | |
| **३) एन जी सेल्टर को.ऑ.हौ.सो.लि.बि.नं -२ यांचे दि.२२/०७/२०२४ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | गुलमोहर | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड एन जी सेल्टर को.ऑ.हौ.सो.लि. बि नं -२ बेवर्ली पार्क सिनेमॅक्स बाजूला, मिरारोड (पु.) येथिल असून जमिनी पासून उखडलेले आहे. झाडाची मुळे जमिनीवर येऊन टाईल्स उखडल्या असून काही मुळे जवळ असलेल्या गटाराच्या चेंबर मध्ये जाऊन चेंबरला देखील तडा गेला आहे. तसेच झाड उखडल्यामुळे वाकुन शेजारी असलेल्या केबीनवर पडलेले आहे. तरी जोराच्या वाऱ्याने व पावसाने सदर झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

Scanned with CamScanner

| ४)मा.अनिल बि.भोसले यांचा दि. ३१/०७/२०२४ रोजीचा अर्ज. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
| १ | रेन्ट्री | ३० ते ३५ फुट | ०१ | २० वर्ष | सदरचे झाड मनपा रोड वरील असुन मातीचा भराव काढल्याने झाडांची मुळ्यावर येवून झाड एकाबाजुला झुकलेले आहे. झाडांच्या बाजुस झोपडपट्टी असुन तेथे अंगणवाडी, मुलांची शाळा भरते, जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडुन जिवत व वित्तहाणी होण्याची शक्यता नाकरता येता नाही. तरी सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | जांभुळ | ३० ते ३५ फुट | ०१ | २० वर्ष | सदरचे झाड मनपा रोड, विष्णू मंदिर महाजनवाडी झोपडपट्टी येथिल असून झाडांच्या फाद्या पडुन झोपडपट्टी मध्ये पडुन घरांच्या पत्र्याचे नुकसान होत आहे. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडुन जिवत व वित्तहाणी होण्याची शक्यता नाकरता येता नाही. तरी सदरील झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner